धीरुभा देवसिंग गोहिल

विरुद्ध

द स्टेट ऑफ बॉम्बे.

[समवेतच्या अपिलाच्यासह]

[मेहरचंद महाजन सी. जे., मुखर्जी, विवियन बॉस, जगन्नाथदास आणि वेंकटरामा अय्यर न्यायमूर्ती गण .]

भारतीय संविधान (पहिली दुरुस्ती) कायदा, 1951, कलम 31-ब-भारत सरकार कायदा, 1935 (25 आणि 26 भू. 5 सीएच. 42), एस.299-बॉम्बे तालुकादारी कार्यकाल निर्मूलन कायदा, १९४९१९४९ चा (1949 चा ४ व मुंबई कायदा)-संविधानाच्या अधिकारकक्षेच्या बाहेर आहे काय.

असे निर्णीत केले आहे कि, मुंबई तालुका कार्यकाल निर्मूलन कायदा, १९४९(१९४९ चा ४२ व मुंबई कायदाI)याच्या वैधतेवर असा आक्षेप घेतला जाऊ शकत नाही की, तो भारतीय राज्यघटनेने प्रदान केलेले मूलभूत अधिकार काढून घेतो किंवा कमी करतो. अनुच्छेद 31-ब, हि

तरतूद १९५१ मध्ये पहिल्या दुरुस्तीद्वारे राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आली आहे आणि हा कायदा विशेषतः नवव्या अनुसूचीमध्ये आयटम क्रमांक ४ म्हणून गणला गेला आहे.

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३१-ब मध्ये वापरलेल्या भाषे मधून असे स्पष्ट होत आहे कि भारत सरकार कायदा चे कलम २९९ खाली सुद्धा १९४९ चा ४२ वा मुंबई कायदा याच्या वैधतेला आव्हान देता येणार नाही

बिहार राज्य विरुद्ध दरभंगाचे महाराजाधिराज सर कामेश्वर सिंग आणि इतर ([१९५२] एस. सी. आर.८८९)

दिवाणी अपील न्यायाधिकारीता : दिवाणी अपील क्रमांक १८८,१८८[अ], १८८[ब] आणि १८८[ई] /१९५२ .

दिनांक ६ डिसेंबर १९५१ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचा दिवाणी अर्ज क्रमांक. ४०९,४१०, ४११ आणि ७८० /१९५१ मध्ये दिलेले एकत्रित न्यायनिर्णय निकाल आणि आदेशा विरुद्ध केलेले भारतीय राज्यघटना चे अनुच्छेद १३३[१][सी] अन्वये दाखल केलेले अपील:

वकील :

१] दिवाणी अपील क्रमांक 188 मधील अपीलकर्त्यासाठी : सी. जी. शास्त्री आणि नौनीत लाल यांनी 1952

२] दिवाणी अपील क्रमांक 188 (अ), 188 (ब) आणि 188 (ई) मधील अपीलकर्त्यांसाठी : देवीसिंह गोहिल एन. सी. चॅटर्जी (सोबत ओंकारनाथ श्रीवास्तव आणि वि. राजिंदर नारायण यांचे राज्य, त्यांच्यासोबत)

३] सर्व सामनेवालेंसाठी : भारताचे महाधिवक्ता एम. सी. सीतलवाड आणि भारताचे महाधिवक्ता सी. के. दफतरी (त्यांच्यासोबत पोरस ए. मेहता आणि पी. जी. गोखले)

न्यायनिर्णय हा दिनांक ११ ऑक्टोबर १९५४ रोजी न्यायमूर्ती जगन्नाथदास यांनी जाहीर केलेला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने जे काही अनुच्छेद २२६ खाली एकत्रित निर्णयाने निकाली काढले होते त्यामध्ये अपील दाखल करणेस अनुच्छेद १३३[१][३] खाली दिलेल्या परवानगी अन्वये सदरची अपिले दाखल करणेत आलेली आहेत. या अपिलांमध्ये हा छोटा मुद्धा आहे कि बॉम्बे तालुकदारी निर्मूलन कायदा १९४९[ज्याला या नंतर कायदा असे सम्बोधले आहे] हा कायद्यानुसार वैध आहे काय. आक्षेपित कायदा हा त्याच्या नावांमधूनच दर्शवितो कि तो

मुंबईतील तालुकदारी चा कार्यकाळ समपुष्टात आणणेसाठी केला गेला होता. सदर कायद्याचे कलम ३ मध्ये अशी तरतूद आहे कि तो कायदा अ स्तित्वात आले दिवशी ज्या-ज्या ठिकाणी लागू होताअया त्या ठिकाणी तेव्हा पासून तो गैरलागू झाला असे मानले जाईल. कलम ५[१][३] प्रमाणे तालुकदारी जमिनीं यांचा महसूल हा मुंबई जमीन महसूल कायदा व त्याखालील नियमाप्रमाणे देणे बंधनकारक असेल व होते. कलम ६ विस्तृतपणे म्हणतो कि तालूकंदरी मध्ये अंतर्भूत असलेल्या मिळकतीमधील सर्व वस्तू व तालुकदार याचे त्या मधील सर्व अधिकार हे सरकार कडे त्या त्यांच्या मिळकती आहेत असे वर्ग होतील व तालुकदार याचे त्यामधील सर्व अधिकार नष्ट होतील. सदर वर्ग झालेल्या मिळकती व नष्ट झालेले अधिकाराबाबत नुकसानभरपाई देणेही तरतूद कलम ७ मध्ये आहे. ते कलम नुकसानभरपाईचे मूल्य कसे काढावे याबाबत तत्वे देखील सांगितली आहेत. कलम १४ मध्ये अशी तरतूद आहे कि कलम ७ आगर सदर कायद्यामध्ये जर कुठेही तरतूद त्याबाबत नसेल तर भुसम्पादन कायद्या मधील तरतुदींचा नुकसान भरपाई देणेबतचे तरतुदींचा संदर्भ घेऊन वर्ग झालेल्या जमिनी व नष्ट झाले अधिकाराबाबत ची नुकसान भरपाई ठरवली जावी. अशी सदर कायद्याची मुरव्य वैशिष्ट्ये असून ती या प्रकरणाशी संदर्भित आहेत.

सदर आक्षेपित कायद्याच्या वैधतेबाबत आक्षेप असून म्हणजे त्या तरतुदी या सार्वजनिक हेतूसाठी नसून त्यासाठी भरपाई देणेही ची तरतूद हि भ्रामक आहे. सदर कायदा सार्वजनिक

हेतूचा विचार केला तर सदर रद्ध केलेल्या कायद्यामुळे रद्ध केलेले अधिकारांवर पडलेला जो प्रभाव तो सार्वजनिक हेतू साठी नाही हा आक्षेप मान्य करून घेणेसाठी खूप उशीर झालेला आहे. सदर कायद्यात नुकसानभरपाई देणे बाबत जी तरतूद केली आहे ती भ्रामक आहे असा गम्भीर स्वरूपाचा युक्तिवाद केलेला आहे. हे लक्षात घ्यावे लागते कि सदर कायदा हा मुंबई विधिमंडळाने १९४९ साली केला आहे. या कायद्याला राज्यपाल यांनी १८ जानेवारी १९५० सम्मती दिली होती व शासकीय राजपत्रा मध्ये तो २४ जानेवारी १९५०न ला प्रसिद्ध झाला होत. उच्च न्यायालयात आक्षेप असा घेतला होता कि या कायद्याने गव्हर्मेंट ऑफ इंडिया ऍक्ट १९३५ मधील कलम २९९ च्या तरतुद जी खाली नमूद केलेप्रमाणे आहे , त्यांचे उल्लंघन झालेले आहे:

“[१] कोणत्याही व्यक्तीस त्याच्या ब्रिटिश इंडिया मध्ये असलेल्या मालमते पासून पासून कायद्याच्या अधिकाराशिवाय वंचित करता येणार नाही.

[२] सार्वजनिक कारणासाठी कोणतीही जमीन, कोणतीही व्यापारी अगर औद्योगिक संस्था किंवा त्यामधील हक्क , किंवा कोणत्याही कंपनीच्या मालकीची असलेली कोणतीही व्यापारी किंवा औद्योगिक संस्था [undertaking] चे अनिवार्य भूसंपादन करणेस प्राधिकृत करत आहेत असे कोणतेही कायदे करणेचे अधिकार फेडरल किंवा प्रांतीय विधिमंडळास याना

नाहीत कि जोर्यंत त्या सदर सम्पादन केले जाणाऱ्या मालमत्तेची नुकसान भरपाई देणे बाबत तरतूद केली गेलेली नाही किंवा सदर नुकसान भरपाई देणेबाबत ची तत्वे नमूद केलीली नाहीत कि ज्या तत्वांच्या प्रमाणे व आधारे सदर नुकसानभरपाई निश्चित करता येईल."

ऊच्च न्यायालयासमोर असा युक्तिवाद करणेत आला कि हा कायदा असा आहे कि ज्याच्या अघटनात्मक आक्षेपासम्बन्धी संरक्षण मिळणेसाठी राष्ट्रपती यांचे कडून संविधानाच्या अनुच्छेद ३१ चे खंड ६ खाली परवानगी घेता अली असती, परंतु तसे न केले गेल्यामुळे गव्हर्नमेंट ऑफ इंडिया चे कलम २९९ चे तथाकथितरित्या उल्लंघन झाले आहे असा आक्षेप घेणेबाबतची जबाबदारी तशीच राहते. उच्च न्यायालयाचे विध्यमान न्यायमूर्ती हे सदर कायदयास आजच्या संविधानामधील कोणत्याही तरतुदी खाली सदर कायदा बाबत जो आक्षेप घेतला आहे तशा प्रकारचे आक्षेप घेणे सरंक्षण आहे किंवा नाही या प्रश्नाच्या मुळाशी न जाता, सदर प्रस्तुत आक्षेपाची गुणवत्ता तपासली व असे निर्णीत केले आहे कि सदर कायदा हा सार्वजनिक उद्धेशासाठी केला असून आणि त्यामध्ये केलेली नुकसानभरपाई संबंधी भ्रामक नाही तसेच अन्यायकारक नाही व त्यामुळे त्याने गव्हर्मेंट ऑफ इंडिया ऍक्ट मधील कलम २९९ च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन झालेले नाही.

हे सत्य आहे कि सदर कायदा हा राष्ट्रपतींकडे अनुच्छेद ३१ च्या खंड ६ खाली प्रमाणपत्र प्राप्त

करणेसाठी सादर करता आला असता परंतु तसा प्रयत्न केलेला नाही . परंतु सदरहू कायदा घटनेच्या अनुच्छेद ९मध्ये नमूद असलेले कायद्यांपैकी एक असून तो आयटम [४] मध्ये आहे व १९५१ मध्ये घटनेमध्ये प्रथम दुरुस्ती करून अनुच्छेद ३१-ब जो अंतर्भूत केलेला आहे ती खाली नमूद केली आहे:

" अनुच्छेद ३१-क मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींच्या व्यापकतेला बाधा न येता ९ व्य अनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्यापैकी कोणताही अधिनियम अकिंवा विनियम अथवा त्यांच्या तरतुदींपैकी कोणतीही तरतूद हि, याभागाच्या कोणत्याही तरतुदीद्वारे प्रदान केलेल्या कोणत्याही हक्कांशी विसंगत आहे अगर त्याच्या मुळे कोणताही हक्क हिरावला जातो , त्या हक्कांचा संकोच होतो या कारणावरून असा अधिनियम, विनियम श्यून्यवत आहे किंवा कधी काळी श्यूनवत होती असे मानले जाणार नाही आणि कोणत्याही न्यायालयाचा आगर न्यायाधिकरणाचा न्यायनिर्णय , हुकूमनामा अगर आदेश विरुद्ध असला तरी , कोणत्याही सक्षम विधिमंडळास उक्त अधिनियमांपैकी आणि विनियमांपैकी प्रत्येक अधिनियम व विनियम निरसीत करण्याचा अगर त्यात सुधारणा करण्याचा जो अधिकार असेल, त्यास अधीन राहून त्या प्रत्येकाचा अंमल चालू राहील. "

त्यामुळे वरील दुरुस्ती द्वारे आणि सदर कायदा हा नवव्या अनुच्छेदात वैशिष्ट्यपणे नमूद

केलेला असलेमुळे आम्हाला असे दिसते कि सदर कायदया बाबत ज्याप्रकारचा आक्षेप या प्रकरणात घेतलेला आहे तसा आक्षेप घेणे पासून स्वच्छ व निसंशयपणे संरक्षण आहे. अपीलकर्ता यांचे विध्यमान वकील यांनी आमचे याविरुद्ध युक्तिवाद केलेला आहे.. ते असे नमूद करतात कि बिहार लँड रिफॉर्म ,१९५०[१९५० चा ३० वा बिहार कायदा] जो नवव्या अनुच्छेदामध्ये पहिला नमूद आहे जो या न्यायालयाने आक्षेपित करणेसाठी घटनेच्या पहिल्या दुरुस्तीनंर परवानगी दिली होती आणि तसेच या न्यायालयाने त्यामधील काही तरतुदी अवैध ठरविलेल्या आहेत. या न्यायालयाच्या सदर निकालपत्र निशसंशयितपणे हे दर्शविते कि त्यामधील आक्षेप स्वीकारला गेला होता आणि त्याला असा प्रभाव देणेत आला होता कि अनुच्छेद ३१-ब ने जरी संरक्षण दिलेले असताना सुद्धा राज्यघटनेत नमूद असलेले मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झालेबाबत आक्षेप घेता येईल . परंतु निकालपत्राचे काळजीपूर्वक वाचन असे निदर्शनास येते कि सदर आक्षेप हा स्वीकारला गेला होता कारण त्यात सदर कायद्या मधील काही तरतुदीं करणेबाबत विधिमंडळाची परिकक्षा किती आहे आणि बहुसंख्य न्यायमूर्तींच्या मते, त्या आक्षेपाचे स्वरूप असे होते कि विधानमंडळाच्या शक्तीच्या वापरावर फसवणूक केलेली आहे [स्टेट ऑफ बिहार विरुद्ध दरभंगाचे महाराजाधिराज सर कामेश्वर सिंग व इतर (१)]: विद्वान वकिलांनी असे विदित केले कि अनुच्छेद ३१-ब खाली असलेले संरक्षण हे फक्त राज्यघटनेच्या मधील तरतुदींबाबत आक्षेप घेणे पुरतेच मर्यादित आहे . आणि त्यामुळे त्या व्यतिरिक्त विषयाबाबत आक्षेप घेणेची त्यांना मोकळीक आहे, म्हणजेच या प्रकरणामध्ये गव्हर्नमेंट ऑफ

इंडिया ऍक्ट मधील कलम २९९ च्या तरतुदीचे उल्लंघन झालेले आहे असा आक्षेप घेतलेला आहे. सदर वकील हे यावर जास्त भर देतात कि अनुच्छेद ३१-ब व खंड [६] मध्ये असलेल्या भाषेमधील फरक , जो गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ऍक्ट चे कलम २९९ चे पोट-कलम [२] चा सन्दर्भ देत आहे. आम्हाला असे वाटते कि तो अनुच्छेद ३१-ब चा अतिशय संकुचित दृष्टिकोन आहे. अनुच्छेद ३१-ब फक्त संविधानाच्या भाग ३ मधील तरतुदीचे केवळ उल्लंघन नाही, परंतु तो सदर आक्षेपित कायद्या हा "या भागातील तरतुदींनी जे अधिकार प्रदान केलेले आहेत त्याच्याशी विसंगत असून त्याने त्यापैकी काहीं अधिकार काढून घेतले आहेत किंवा कमी केले आहेत". राज्यघटनेचा भाग ३ ने व्यक्तीला जो अधिकार प्राप्त झाला आहे तो म्हणजे त्यांची कोणतीही मिळकत हि फक्त सार्वजनिक उद्धेशासाठी सम्पादित केली जाऊ शकते आणि ते पण त्या संबंधी केलेल्या कायद्याने सम्पादन करणेस अधिकृत केलेप्रमाणे आणि त्याची नुकसानभरपाई देणेबाबत तरदूद केलेली असेल, जी निश्चित असेल अगर कायद्याने नियंत्रित केलेल्या नियमानुसार असेल. हा तोच अधिकार आहे जो इंडिया ऍक्ट चे कलम २९९ अन्वये सुरक्षित करणेत आलेला आहे. सदर कायद्याच्या वैधते बाबत जे आव्हान दिलेले आहे ते त्याच अधिकाराचे उल्लंघन झालेले आहे याबाबत आहे. सदर आव्हान हे सदर अधिकार नष्ट झाला यावर संपत नाही, तर गव्हर्मेंट ऑफ इंडिया ऍक्ट चे कलम २९९ ने जो अधिकार सुरक्षेत केला आहे जो विधिमंडळाचे अधिकार प्रतिबंधित करतो आणि त्याच्या सक्षमतेवर प्रतिबंध म्हणून लागू होतो. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ऍक्ट मधील तरतूद हि दुसरे काहीही नसून

विधिमंडळाची सकक्षमता या संबंधी असून व्यक्तीच्या मूलभूत अधिकार प्रभावित झाले आहेत त्या संबंधित आहे. असे सह -संसदीय मंडळाच्या भारतीय राज्यघटनेवरील सुधारणा यावरील अहवाल खंड १, भाग १, परिच्छेद ३६६ व ३६९ या मधून दिसते वाटते. परंतु असा आग्रह करणेत आला आहे कि जरी तसे असले तरी , अनुच्छेद ३१-ब हा फक्त राज्यघटनेच्या भाग ३ ने प्रदान केलेले जे मूलभूत अधिकार आहेत त्यांचे उल्लन्घन करणेचे संरक्षण करते आणि हा अधिकार राज्यघटनेने प्रदान केलेला आहे असे म्हणता येणार नाही . आम्ही या म्हणण्याशी सहमत होऊ शकत नाही .सदर प्रकरण हे असे आहे कि यामध्ये संदर्भित अधिकार ज्याला गव्हर्मेंट ऑफ इंडिया ऍक्ट चे कलम २९९ चे संरक्षण आहे, ज्यामध्ये विधिमंडळाच्या सक्षमतेवर बेडी च्या रूपात संरक्षण आहे आणि तात्पर्य असे आहे कि सदर मूलभूत अधिकार हे , इतर मूलभूत अधिकार जे आजच्या राज्यघटनेने मान्य केलेले आहेत त्या सह-मूलभूत अधिकारांच्या औपचारिक श्रेणीत नेणेत आलेले आहेत. त्यामुळे असे म्हणणे उचित होईल कि सदर अधिकार हा जो पूर्वीपासूनच इतर मूलभूत अधिकारां समवेत होता, त्याला प्रथमतः च राज्यघटनेने प्रदान केलेल्या मूलभूत अधिकारांच्या समूहात एकत्रित करताना संरक्षण दिलेले आहे. अनुच्छेद ३१-ब ची शब्दयोजना यामधून असे लक्षात येते कि सदर संरक्षण हे फक्त काही तरतुदींचे उल्लंघन यासंबंधीच नाही ,तर काही अधिकारांचे असंवैधानिक संक्षेपतीकरन करणे यावर आक्षेप/हल्ला करणेच्या कारणासाठी सुद्धा आहे. अनुच्छेद ३१-ब चा अर्थ लावताना असे म्हणणे अतार्किक होईल कि या तरतुदीने फक्त नवीन राज्यघटनेतील काही तरतुदींचे उल्लंघन झाले तरच

संरक्षण असून जर या कायद्याने जर नवीन राज्यघटनेमधील काही तरतुदी कमी करून गव्हर्मेंट ऑफ इंडिया ऍक्ट चे कलम२९९ जो यापूर्वीच रद्द झालेला आहे, त्या मधील तरतुदीचे चे जर उल्लंघन होत असेल तर त्याला संरक्षण देत नाही. राज्यघटनेच्या नवव्या अनुसूचित समाविष्ट असलेले प्रत्येक कायद्याला संरक्षण देणेमागचा राज्यघटनेचा उद्धेश असा आहे कि राज्यघटनेच्या भाग-३ मधे संरक्षण दिलेल्या मूलभूत अधिकार कोणत्याही कारणास्तव आक्षेपित करता येणार अहित , जरी मग ते पूर्वीपासून अस्तित्वात असलेले अधिकार असोत किंवा अगर नवीन दिलेले अधिकार असोत. त्याबाबत अनुच्छेद ३१-बी अनुच्छेद ३१-ब ची भाषा सुद्धा हे स्पष्ट करते कि विनिर्दिष्ट कायदयाच्या कोणत्याही तरतुदी ह्या, त्या तरतुदींमुळे अवैध आहेत किंवा अवैध होत आहेत असे मानले जाणार नाही आणि जरी तसा न्यायालयाचा अगर न्यायाधिकरणाचा निकाल, हुकूमनामा अगर आदेश विरुद्ध असेल तरी . ". तसेच कोणत्याही सक्षम विधानमंडळास उक्त अधिनियमांपैकी आणि विनियमांपैकी प्रत्येक अधिनियम आणि विनियम निरसीत करण्याचा किंवा त्यात सुधारणा करण्याचा जो अधिकार असेल, त्याला अधीन राहून त्या प्रत्येकाचा अंमल चालू राहील", या मधूनही तसाचा सकारात्मक उद्धेश असले बाबत भर दिला दिलेला आहे .

आम्ही , यामुळे या स्वच्छ मतास आलेलो आहोत कि मुंबई तालुकदारी कार्यकाल निर्मुलन कायदा, १९४९ ची वैधता ज्या कारणास्तव आव्हानित केली गेलेली आहे त्या कारणास

कायदेशीर मान्यता नाही. त्यामुळे सर्व अपिले हि खर्चासह नामंजुरच होत आहेत/ काढुन टाकणेत येत आहेत. खर्च एका संचिकेत.

अपिले काढून टाकणेत आली .

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x